बृहन्मुंबई महानगरपालिका
ई मेल : stenodeanl@gmail.com, dean.ltmg@mcgm.gov.in, फोन नं.: 022 24063001 / 02
लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व
लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई-२२

क्र. लोटिरु / 37284 / अधिष्ठाता, दि.14.02.2022.

विषय - लो.टि.म.स.रुग्णालयातील विविध विभागात कंत्राटी तत्त्वावर सहाय्यक प्राध्यापक पदे भरण्याबाबत.

लो.टि.म.स.रुग्णालयातील विविध विभागात सहाय्यक प्राध्यापक संवर्गाची पदे सरळसेवेने भरली जातात. या संवर्गातील कर्मचा-यांना सहयोगी प्राध्यापक पदावर नियुक्ती झाली असल्यामुळे तेव्हा कर्मचा-याने धारण केलेले सहाय्यक प्राध्यापक संवर्गाचे पद रिक्त राहिले आहेत. तसेच या संवर्गातील बरेच उमेदवार हे आपला बॉन्ड संपुष्टात आल्यावर दुस-या दिवशी ताबडतोब राजीनामा देत असल्याने या संवर्गातील पदे ही वरचेवर रिक्त होत असतात.

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता अबाधित ठेवण्यासाठी त्यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार सहाय्यक प्राध्यापक संवर्गाची पदे रिक्त असल्यास त्याचा रुग्णसेवेवरही परिणाम होतो. रुग्णावर तातडीने उपचार केले जाऊ शकत नाहीत म्हणून सदर पदे नियमित तत्त्वावर भरेपर्यंत कंत्राटी तत्त्वावर भरणे गरजेचे आहे. सहाय्यक प्राध्यापक संवर्गाची पदे नियमित तत्त्वावर भरण्याची कार्यवाही चालू असून त्यासाठीची जाहिरात लवकरच प्रसारीत होईल असे टो.रा.वै.महाविद्यालयाकडून समजते.

मनपा प्रमुख रूग्णालयात सहाय्यक प्राध्यापकांच्या रिक्त जागा दि.३० जुन २०२२ पर्यंत कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत मा. अति. आयुक्त (प.उप.) यांची क्र. AMC/WS/2157/D DATE-20.10.2021 अन्वये मंजूरी मिळाली आहे व त्यानुसार वेळोवेळी संबधित विभागप्रमुखांकडून मागणीनुसार रिक्त पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात येत आहेत.

लो.टि.म.स.रुग्णालयातील खालील विभागांनी मागणी केल्यानुसार संबंधित विभागातील रिक्त पदे कंत्राटी तत्त्वावर भरण्यासाठी प्रस्ताविण्यात येत आहेत.

| अनु.क्र. | विभागाचे नाव | रिक्त पदे | रिक्त पदांचे कारण |
|---|---|---|---|
| ०१. | व्यवसायोपचार विभाग | ०२ | ०१ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांनी सेवा सोडली असून ०१ सहाय्यक प्राध्यापक हे सहयोगी प्राध्यापक ह्या पदावर पदोन्नत झाले आहेत. |
| ०२. | क्ष - किरणशास्त्र विभाग | ०२ | ०२ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांनी सेवा सोडली आहे. |

यास्तव रिक्त असलेली सहाय्यक प्राध्यापकांची उपरोक्त दर्शविलेली रिक्त पदे तात्काळ कंत्राटी तत्त्वावर भरण्यासाठी मंजूरी आवश्यक आहे.

1. लो.टि.म.स.रुग्णालयातील विविध विभागातील एकूण **04** रिक्त असलेली सहाय्यक प्राध्यापकांची पदे कंत्राटी तत्त्वावर भरण्यासाठी स्थानिक पातळीवर जाहीरात देऊन भरण्यास,
2. कंत्राटी तत्त्वावर नेमणूक करण्यात येणा-या सहाय्यक प्राध्यापकास शासन निर्णय क्र.वेतनी-2019/प्र.क्र.03/2019/वैसेवा-2दि.31.12.2020संचालक/वै.शि.व.प्र.रु./9943/आयएमपी/ दि.08.04.2021 अनव्ये ठोक वेतन रु.1,00,000/-( रु.एक लाख फ़क्त) एवढी रक्कम कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकास वेतन म्हणून देण्यास,
3. सदर पदांच्या आस्थापनीय खर्च हा लो.टि.म.स.रुग्णालयाच्या आस्थापानेवरील लेखाशिर्षक क्र.210100101 या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यास व सदर कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन असंगणकीय वेतनपत्रक क्रमांक 0932 या वेतनपत्रकातून देण्यास,
4. सदर पद **एक वर्षाच्या कालावधीकरीता** व दर **चार** महिन्यांनी **एक दिवस सेवाखंड** देऊन अथवा सहाय्यक प्राध्यापकाचे पद नियमित तत्वावर भरेपर्यंत यापैकी जे आधी होईल तोपर्यत नेमणूक करण्यास,
5. सदर नियुक्ती केवळ कंत्राटी तत्वावर असल्याने येणा-या उमेदवारांना निवृत्तीवेतन योजना व भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही,
6. कंत्राटी कर्मचा-यांकडून रुपये 100/- च्या बॉन्ड पेपरवर विहित नमुन्यात बंधपत्र घेण्यास,
7. कंत्राटी कालावधीतील सेवा समाधानकारक न आढळल्यास सदर कंत्राट कालावधी कोणतीही पूर्वसूचना न देता संपुष्टात / खंडीत करण्याबाबत,
8. सदर नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असल्याने भविष्यात कोणत्याही प्रकारे या पदावर हक्क सांगता येणार नाही,

**शैक्षणिक अर्हता**:- उमेदवार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तसेच मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदव्युत्तर पदविका, ( एम.डी. पदवी किंवा डी.एन.बी), सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे की, शैक्षणिक (गुणपत्रिका व प्रमाणपत्रे), एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, मराठी विषय घेऊन एस.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण,इ. च्या प्रमाणित प्रतीलिपी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. सदर पदासाठीची अर्हता **National Medical Commission (NMC) यांच्या मान्यताप्राप्त अर्हता सोबत** पृ.क्र. जोडण्यात आलेल्या आहेत.

**अनुभव**:- मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयातील (निवासी/रजिस्ट्रार/डेमॉन्स्ट्रेटर/टयूटर) म्हणून **तीन वर्षांचा** शिक्षक पदाचा अनुभव असावा. सदर नियुक्ती तदर्थ तत्त्वावर एकावेळी 120 दिवसांपेक्षा जास्त नाही, इतक्या कालावधीकरीता, प्रत्येक 120 दिवसांपूर्वी एक दिवस सेवाखंड देऊन पुनर्नेमणूक अथवा

टीप:- 1) उमेदवारांसाठी संबंधित मुलाखतीचे अर्ज लो.टि.म.स. रुग्णालयातील रोख विभाग, खोली क्रमांक १५ येथे दिनांक १४.०२.२०२२ पासून ते १६.०२.२०२२ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.३० ते दुपारी ०३.३० या कार्यालयीन वेळेत उपलब्ध असतील व दि.१६.०२.२०२२ पर्यत संध्याकाळी ०४.३० वाजेपर्यत अर्ज जमा करता येईल.

| | | |
|---|---|---|
| खुला प्रवर्गासाठी | – | रु.300 + जी.एस.टी. |
| राखीव प्रवर्गासाठी | – | रु.200 + जी.एस.टी. |

2) उमेदवाराच्या मुलाखती ह्या सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार होतील.

सही/-
15.02.2022
**अधिष्ठाता**
**लो.टि.म.स.रुग्णालय, शीव.**